# DIGITAL LECTURE SERIES



















I/C PRINCIPAL
Agashi Virar Arnala Education Society's
Padmashree Bhausaheb Vartak College of Commerce
Virar (E)

Agashi Virar Arnala Education Society's
Padmashree Bhausaheb Vartak College of Commerce
VIRAR (E)

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी डिजिटल व्याख्यानमाला संपन्न!

विरार : आगाशी विरार अर्नाळा शिक्षण संस्था संचलित विरार पूर्व येथील पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय व एन .जी. वर्तक कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली डिजिटल व्याख्यानमाला संपन्न झाली. सदर व्याख्यानमालेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या सारिका रावत मॅडम यांनी केले व विद्यार्थ्यांना आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून व्याख्यानमालेसाठी शुभेच्छा दिल्या . सदर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प महाविद्यालयाच्या शिक्षिका सौ. शितल वर्तक (क्रीडा प्रमुख) यांनी योगाद्वारे ताण व्यवस्थापन या विषयावर गुंफले. व्याख्यान मालेचे दुसरे पुष्प सहाय्यक प्राध्यापक श्री. निखिल नाईक ( लघुलेखक ) यांनी रचनात्मक लेखन या विषयावर गुंफले . व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पात महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. स्टेफिना डीकुन्हा यांनी लॉकडाऊन काळात वाचनाचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . व्याख्यानमालेचे चौथे पुष्प सहाय्यक प्राध्यापिका सौ. ध्रुवाली वर्तक (माहिती व तंत्रज्ञानाचा उत्तम अनुभव) यांनी गुंफले . या व्याख्यानात त्यांनी विद्यार्थ्यांना नवनवीन डिजिटल अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली व त्याचे महत्त्व पटवून दिले . व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प सहाय्यक प्राध्यापिका कु. उषा उगरेजिया ( कला प्रशिक्षिका ) यांनी गुंफले. या शेवटच्या व्याख्यानात त्यांनी वारली पेंटिंग या विषयावरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . व्याख्यानमालेच्या सांगता सोहळ्यात महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. शितल कोरडकर यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या हस्ते डिजिटल प्रमाणपत्र देण्याची ची लिंक सुरू करून सर्व विद्यार्थ्यांना डिजिटल प्रमाणपत्र देण्यात आले . या व्याख्यानमालेत एकूण ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला . सदर व्याख्यानमालेसाठी महाविद्यालयाच्या माहिती व तंत्रज्ञान शिक्षिका सौ. उन्नती घुरी यांनी तांत्रिक बाबींचे काम पाहिले . व्यवस्थापन मंडळाचे व्याख्यानमालेसाठी विशेष सहकार्य लाभले .

Agashi Virar Arnala Education Society's
Padamashree Bhausaheb Vartak College of Commerce
VIRAR (E)

9:07 AM




# लॉकडाऊन काळात विद्यार्थ्यांसाठी डिजिटल व्याख्यानमालेचे आयोजन

आ.वि.अ शिक्षण संस्था संचलित विरार पूर्व येथील पद्मश्री भाऊसाहेब वर्तक व एन.जी.वर्तक कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने लॉकडाऊन काळात विद्यार्थ्यांसाठी विविध विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. तज्ञ शिक्षकांनी पाच व्याख्याने विद्यार्थ्यांना दिली. प्राचार्या सारिका रावत यांनी उद्घाटनावेळी भाषण केले. तसेच पर्यवेक्षिका शितल कोरडकर यांनी सांगता समारंभाच्या वेळी भाषण केले.

Posted at
7:01 AM Today
23 of 48 Top Stories

घरी थांबा - सुरक्षित रहा. डाऊनलोड way2news #IndiaReadsWay2News

Agashi Virar Arnala Education Society's
Padmashree Bhausaheb Vartak College of Commerce
VIRAR (E)

I/C PRINCIPAL
Agashi Virar Arnala Education Society's
Padmashree Bhausaheb Vartak College of Commerce
Virar (E)